# <u>प्रसिध्दीपत्रक</u>

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे-०१ यांचे मार्फत दि. ०२ जुलै २०१८ ते दि. ०६ जुलै २०१८ या कालावधीत शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जुलै-२०१८ (टंकलेखन व लघुलेखन) महाराष्ट्र व गोवा राज्यातून १६२ केंद्रांवर घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेची प्रवेशपत्रे परिषदेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावर दि. २२ जून २०१८ रोजी जाहिर करण्यात येणार आहेत.

संबंधित टंकलेखन व लघुलेखन संस्थाचालकांनी त्यांच्या संस्थेतील सर्व परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संकेतस्थळावरुन डाऊनलोड करून संबंधित परीक्षार्थ्यांना वितरित करण्याची व्यवस्था करावी.

**तसेच ज्या विद्यार्थ्याच्या प्रवेशपत्रावर फोटो नसल्यास किंवा चुकीचा असल्यास अशा संबंधित संस्थाचालकांनी विद्यार्थ्यांसह (विद्यार्थ्याचा फोटो व ओळखपत्रासह) समक्ष या कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन प्रवेशपत्रावर मा.आयुक्त, परीक्षा परिषद,पुणे यांची सही व शिक्का घ्यावा तरच संबंधित विद्यार्थ्यास परीक्षेस प्रविष्ठ होता येईल.**

सर्व परीक्षार्थ्यांनी त्यांची ऑनलाईन प्रवेशपत्रे आपल्या टंकलेखन/लघुलेखन संस्थेतुन परीक्षेपुर्वी हस्तगत करावे.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-०१

GCC EXAM JUNE-18/EXAMTIME LETTER29518